७) संरक्षित भिंत- - केंद्र शाळेभोवती चारही बाजुंनी संरक्षित कंपाउंड भिंत असावी.

८) स्वच्छताग्रहे/प्रसाधनगृहे - मुला/मुलींसाठी स्वतंत्र पक्की व विद्यार्थी संख्येनूसार पुरेशी स्वच्छतागृहे असावीत.सदरच्या स्वच्छतागृहात कायमस्वरुपी पाणीपुरवठा असावा.

९) वैद्यकीय सुविधा - केंद्रशाळा/ क.म.वि. मध्ये अद्यावत प्रथमोपचार पेटी असावी.नजिकच्या अंतरावर खाजगी/सरकारी वैद्यकीय सुविधा उपलब्ध असावी.

१०) अन्य सुविधा - पोस्ट ऑफीस केंद्राच्या जवळ असावे, बस व्यवस्था, पोलीस स्टेशन किमान नजीकच्या अंतरावर असावे.तसेच परीक्षा विषयक गोपनिय साहीत्य ठेवण्यासाठी पुरेशी सोय अणि सुरक्षितता असावी.

क) परीक्षा केंद्रावर समाविष्ट शाळा/क.म.वि. ची संख्या किमान २ शाळा/कनिष्ठ महाविद्यालये असावीत. परंतु दोन्ही शाळा/क.म.वी. शक्यतो एकाच संस्थेची नसावीत.

ड) नव्याने सांकेतांक प्राप्त शाळा/ क.म.वि. यांना शक्यतो दोन वर्षापर्यंत परीक्षा केंद्र देण्यात येणार नाही. तसेच नविन केंद्रास तीन वर्षाकरीता केंद्र संचालक हा त्या शाळा/ क.म.वि.व्यतीरीक्त अन्य घटकातून देण्यात येईल.

इ) नविन परीक्षा केंद्र देतांना जुन्या परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी संख्येवर परीणाम होवू नये. व सदर केंद्र निकषबाहय होता कामा नये. संलग्न होणा-या शाळा/ क.म.वि. नविन केंद्रास समाविष्ट होत असल्याबाबत त्यांचे संमतीपत्र घेण्यात यावे.मूळ केंद्रावर परिणाम होत नसल्याबाबत मूळ केंद्राचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

१) छापील अर्जाचा नमुना विभागीय मंडळाकडून पुरवण्यात येईल, (अर्जाची किंमत रु.१०००/- नापरतावा इतकी राहील).

२) परीक्षा केंद्र सुरु करणा-या शाळेने/क.म.वि. यांनी केंद्र मागणी प्रस्ताव गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक )यांच्या शिफारसीसह/अभिप्रायासह परिपुर्ण प्रस्ताव त्या-त्या शैक्षणिक वर्षी दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत पाठवावेत.

३) केंद्र प्रस्तावासोबत (ना-परतावा) छाननी शुल्क रु.१०,०००/- रोखीने भरणा करुन पावती सोबत जोडावी.

४) दिनांक ३१ ऑगस्ट या अंतीम निर्धारीत मुदतीत प्राप्त झालेल्या नविन केंद्र मागणी प्रस्तावांबाबत सक्षम समितीमार्फत तपासणी करुन केंद्राबाबत आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येईल.तसेच निर्धारित मुदतीनंतर नविन केंद्र मागणी प्रस्ताव मंडळाकडून स्विकारले जाणार नाही.

५) प्रशासकीय दृष्या केंद्र मंजुरी देण्याचा अधिकार विभागीय मंडळाच्या सक्षम समितीस राहील.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रत माहिती व कार्यवाहीस्त:-

१)शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.

२)शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. भंडारा, चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली, गोंदिया यांना उपरोक्त बाब आपल्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक /प्राचार्य यांना आपल्या स्तरावरुन कळवावे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर-४४० ००१

msboardnagpur@gmail.co
www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक:नाविमं/गो.सं./के.नि./२२७६/२०२४ दिनांक:२३/०७/२०२४

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ट महाविद्यालये
व माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग, नागपूर

विषय:- माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रूवारी/मार्च-२०२५
नविन परीक्षा केंद्र प्रस्तावाबाबत.

संदर्भ:- राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा-८/३८६५ दिनांक २३.०७.२०१९.

उपरोक्त विषयी माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रूवारी/मार्च-२०२५ करीता नविन परीक्षा केंद्र प्रस्ताव सादर करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही निश्चित करण्यात आलेली आहे.

**अ) नविन परीक्षा केंद्र प्रस्ताव अर्ज विक्री व प्रस्ताव सादर करणे:-**

**दिनांक ०१.०८.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ पर्यंत राहील.**

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | इयत्ता १० वी | इयत्ता १२ वी |
|---|---|---|---|
| १ | शहरी भाग विद्यार्थी संख्या | २५० | ३०० |
| | ग्रामिण भाग विद्यार्थी संख्या | २०० | २५० |
| | अतिदुर्गम भागासाठी(नैसर्गिक अडथळे/प्रकल्प क्षेत्र/नक्षलग्रस्तक्षेत्र इ.) | १२५ | १५० |
| १ | नियोजित केंद्रापासून शाळा/कनिष्ट महाविद्यालयापासूनचे अंतर | | |
| | शहरी भाग | अट नाही | अट नाही |
| | ग्रामिण भाग | ५ कि.मी. | १० कि.मी. |

**(टिप:-सर्वात जवळचे केंद्र निवडावे, कोणतीही शाळा/कनिष्ठ महाविद्यालय केंद्र ओलांडून दुस-या केंद्रावर जाणार नाही.)**

**ब) भौतिक सुविधा (मंडळाचे निकष)**

१) केंद्र व्यवस्थापनासाठी २ वर्ग खोल्या आणि २५ विद्यार्थ्यांमागे १ वर्ग खाली याप्रमाणे इमारत/ वर्ग खोल्या असाव्यात.

२) परीक्षेस प्रविष्ट होणा-या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्ग खोल्या पुरेशा असाव्यात.

३) इमारतीच्या खिडक्यांना बारीक जाळया असाव्यात.

४) डूएल डेक्स/बेंच प्रत्येक परीक्षार्थ्यांना एक याप्रमाणे असावे.

५) सुस्थितीतील विद्युत जोडणीसह आवश्यक टयुब/एलईडी बल्ब व पंखे असावेत. अद्यावत संगणक व प्रिंटरसह इंटरनेट सुविधा,सी.सी.टी.व्ही.कॅमेरे असणा-या शाळा/ क.म.वि. यांना निकषानुसार केंद्र देण्यास प्राधान्य देण्यात येईल.

६) जनरेटर सुविधा:- - शाळेच्या/कनिष्ट महाविद्यालयाचे परीक्षा कालावधीत सुस्थितील जनरेटर यंत्र असावे सर्व खोल्यांमध्ये दिवे, पंखे चालू राहतील इतक्या क्षमतचे असावे.किंवा पर्यायी व्यवस्था म्हणून इनव्हर्टर/सौर अर्जा/पवन उर्जा/तत्सम व्यवस्था असावी. अद्यायावत अग्निशामक यंत्रणा असावी.